दिनांक :- ०८.०८.२०१८

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# अधिसूचना

## महानिर्मिती जाहिरात क्र.११ (Sep)/२०१७

महानिर्मिती जाहिरात क्र. ११(Sep)/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेल्या "निम्नस्तर लिपिक (मासं) व निम्नस्तर लिपिक (लेखा)" या पदांच्या सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने सदर पदांची ऑनलाईन परीक्षा दि.११ व १२ नोव्हेंबर २०१७ रोजी पार पाडण्यात आली होती. तथापि, सदर ऑनलाईन परीक्षा दरम्यान औरंगाबाद येथील परीक्षा केंद्रातील पेपर फुटीच्या प्रकरणाबाबत पोलीस स्टेशन मुकुंदवाडी येथे गुरनं.६९७/२०१७ मध्ये कलम ४१९,४२०,४६५,४६८,४७१,१२०(ब) भादविसं, कलम ६,७,८ महाराष्ट्र प्रतिबंद व माल प्रॅक्टीस ॲक्ट सहकलम ६६(सी),६६(डी) आयटि ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झालेला असुन सदर प्रकरणी वरीष्ठ पोलीस निरिक्षक,पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद(श) यांच्यामार्फत प्रकरणाचा तपास सुरु आहे.

सबब, सदरील पदांच्या परीक्षेत पारदर्शकता असावी याकरिता, वरील ऑनलाईन परीक्षा प्रशासकिय कारणास्तव रद्दबातल करण्यात येत आहे. तसेच सदर पदांची ऑनलाईन परीक्षा ही पुनच्छ: घेण्यात येणार असून त्याबाबतचा सविस्तर तपशील महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती